# महाराष्ट्र शासन
# उच्च शिक्षण संचालनालय
# शिक्षण शुल्क समिती,मुंबई

(विना अनुदानित व कायम विना अनुदानित शिक्षणशास्त्र आणि शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालयांसाठी)

शासकीय अध्यापक महाविद्यालय, १ ला मजला, एलफिन्स्टन तंत्र विद्यालय आवार, धोबीतलाव, ३,महापालिका मार्ग, मुंबई-४००००१.
E-mail-sssbedmed@gmail.com/jd.hesss.mh@gov.in दूरध्वनी-02222694478 Web-www.sssmumbai.org

क्र.शिशुस/शु.नि.अर्ज/शै.व.२०१९-२०/२०१९/५३७ दि.०७.०९.२०१९

प्रति,

१)प्राचार्य,
सर्व शासकीय विना अनुदानित एम्.एड्. अभ्यासक्रम महाविदयालये,

२)प्राचार्य,
सर्व अशासकीय विना अनुदानित बी.एड्.,बी.पी.एड्. एम्.एड्.,एम्.पी.एड्.,
एकात्मिक बीए.-बी.एड्.,बी.एससी.-बी.एड्.,बी.एड्.-एम्.एड्.
अभ्यासक्रम महाविदयालये (अल्पसंख्याक महाविदयालये वगळून),

३)प्राचार्य,
भारतीय पुर्नवास परिषद मान्यताप्राप्त सर्व अशासकीय विना अनुदानित
विशेष बी.एड्. अभ्यासक्रम महाविदयालये (अल्पसंख्याक महाविदयालये वगळून)
महाराष्ट्र राज्य.

**विषय- विना अनुदानित बी.एड्.,बी.पी.एड्.,एम्.एड्.,एम्.पी.एड्.विशेष बी.एड्.,एकात्मिक बीए.-बी.एड्.,बी.एससी.-बी.एड्.,बी.एड्.-एम्.एड्.अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० च्या प्रवेशित विदयार्थ्यांच्या शिक्षण शुल्क निश्चितीसाठी प्रस्ताव सादर करण्याबाबत.**

उपरोल्लिखित विषयाबाबत आपणांस सूचित करण्यात येते की,शासन निर्णय दि.०५.०७.२०१३ अन्वये विषयांकित विना अनुदानित अभ्यासक्रमांचे शिक्षण शुल्क निश्चित करण्यासाठी शिक्षण शुल्क समितीची स्थापना करण्यात आली आहे, हे आपणांस विदित आहेच. सदर स्थापनेच्या कार्यकक्षेनूसार सन २०१६-२०१७ मध्ये शिक्षण शुल्क समितीकडून शुल्क निश्चिती करून घेतलेल्या तसेच आजतागायत शुल्क निश्चितीसाठी शिक्षण शुल्क समितीकडे न आलेल्या महाविदयालयांतील विना अनुदानित बी.एड्./बी.पी.एड्./एम्.एड्./एम्.पी.एड्./विशेष बी.एड्./एकात्मिक बीए.-बी.एड्./एकात्मिक बी.एससी.-बी.एड्./एकात्मिक बी.एड्.-एम्.एड्.अभ्यासक्रमांच्या शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० च्या प्रवेशित विदयार्थ्यांच्या शिक्षण शुल्क निश्चितीसाठी विहित नमुन्यातील परिपूर्ण प्रस्ताव सादर करण्यासाठी सदर परिपत्रकादवारे/पत्रादवारे आपणांस सूचित करण्यात येत आहे.सदर परिपूर्ण प्रस्ताव सादरीकरणासाठी खालील सूचनांचे/निर्देशांचे काटेकोर अनुपालन महाविदयालयीन स्तरावरून अनिवार्य आहे :-

१) प्रस्ताव सादरीकरणासाठी शिक्षण शुल्क समितीच्या संकेतस्थळावर स्वतंत्ररित्या प्रसिदध केलेल्या विदयापीठनिहाय वेळापत्रकाचे अनुसरण करणे क्रमप्राप्त आहे.

२) शिक्षण शुल्क समितीच्या संकेतस्थळावर स्वतंत्ररित्या प्रसिदध केलेल्या सुधारित नमुना अर्ज आणि नियमावलीनूसार परिपूर्ण प्रस्ताव सादर करावा/करावेत.अपूर्ण/परिपूर्ण नसलेले प्रस्ताव नाकारण्याचे/फेटाळण्याचे सर्वाधिकार प्रस्तुत कार्यालयास असल्याने अपूर्ण किंवा चूकीच्या माहितीअभावी आणि सादरीकरणाअभावी विषयांकित अभ्यासक्रमाची शिक्षण शुल्क निश्चिती न झाल्यास किंवा प्रस्ताव फेटाळला गेल्यास त्याचे उत्तरदायित्व सर्वस्वी संस्था आणि महाविदयालयाचे राहील.

३)उच्च व तंत्र शिक्षण विभाग,महाराष्ट्र शासनाच्या शासन निर्णय दि.०५.०७.२०१३ व दि.१९.०१.२०१६ मध्ये नमूद केल्यानूसार विहित नोंदणी शुल्क सहसंचालक, शिक्षण शुल्क समिती,मुंबई (Joint Director, Shikshan Shulk Samiti, Mumbai) यांचे नावे आर.टी.जी.एस./एन.ई.एफ.टी.दवारे बँक ऑफ इंडिया,काळबादेवी शाखा,मुंबई येथील खाते क्रमांक-002420110001315 (आय.एफ.एस.सी.क्रमांक-BKID0000024)येथे जमा करावे.

Scanned by CamScanner

४ )शिक्षण शुल्क समितीच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केलेल्या दि.०६.०९.२०१९ च्या बैठकीच्या इतिवृत्तानुसार नोंदणीकृत सनदी लेखापालाने प्रमाणित केलेल्या मागील वर्षाच्या लेखापरिक्षित अहवालातील (ऑडिटेड स्टेटमेंटमधील )खर्चाच्या ०.५% रक्कम महसंचालक, शिक्षण शुल्क समिती,मुंबई (Joint Director, Shikshan Shulk Samiti, Mumbai) यांचे नावे धनाकर्षा च्या (Bank D.D.) स्वरूपात प्रक्रिया शुल्क म्हणून प्रस्तावासोबत सादर करणे अनिवार्य आहे.

५ )विहित नमुन्यातील अनुषंगिक अभिलेखांसहचा आपला परिपूर्ण प्रस्ताव स्पायरल वाईंडिंग स्वरूपात ३ प्रतीत (spiral binded 3 copies) संकेतस्थळावरील वेळापत्रकात नमूद केलेल्या कालावधीतच सकाळी ११.०० ते २.०० या वेळेत महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी व्यक्तिश: प्रस्तुत समिती कार्यालयात सादर करावा/करावेत. विहित मुदतीनंतर आलेले प्रस्ताव स्विकारले जाणार नाहीत.

महसंचालक,
शिक्षण शुल्क समिती,मुंबई

प्रत माहितीस्तव सादर:-
१.मा.अध्यक्ष, शिक्षण शुल्क समिती, मुंबई तथा मा.सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
२.मा.सदस्य सचिव, शिक्षण शुल्क समिती, मुंबई तथा मा.संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११००१.

Scanned by CamScanner

**महाराष्ट्र शासन**
उच्च शिक्षण संचालनालय
**शिक्षण शुल्क समिती,मुंबई**
( विनाअनुदानीत व कायमविनाअनुदानीत शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालयांसाठी)
कार्यालयाचा पत्ता–शासकीय अध्यापक महाविद्यालय, एलफिन्स्टन तांत्रीक विद्यालय आवार,
१ ला मजला, ३ महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई–४०० ००१
E-mail :- sssbedmed@gmail.com / jd.hesss-mh@gov.in Tel -022 22694478 Web-www.sssmumbai.org

**राज्यातील विनाअनुदानीत व कायमविनाअनुदानीत शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षणशास्त्र अभ्यासक्रम महाविद्यालये व विद्यापीठाची केंद्र यांचे साठी शिक्षण शुल्क समितीचे २०१९–२१ या वर्षाचे शुल्क निश्चितीबाबतचे प्राप्त होणा–या प्रस्तावांकरिताचे वेळापत्रक**

| अ. क्र. | तपशिल | कालावधी | |
|---|---|---|---|
| | | पासून | पर्यंत |
| १ | नमुनाअर्ज संकेतस्थळावर अपलोड करणे. | ०६.०९.२०१९ | – |
| २ | नमुनाअर्जानुसार भरलेले अर्ज ३ प्रतीत स्वाक्षरीनीशी व आधारीत आवश्यक कागदपत्रांसह सहसंचालक, शिक्षण शुल्क समिती, मुंबई या कार्यालयास हार्ड कॉपी मध्ये सादर करणे. | ०७.०९.२०१९ | ०५.१०.२०१९ विद्यापीठनिहाय खालीलप्रमाणे** |
| ३ | प्राप्त अर्जाची छाननी करून त्रुटी असल्यास ई–मेलव्दारे कळविण्यात येतील.(त्या तात्काळ पूर्ण करणे महाविद्यालयांना/केंद्रांना बंधनकारक राहील) | १७.०९.२०१९ | १५.१०. २०१९* |
| ४ | छाननी झालेले अर्ज अभ्यासक्रमनिहाय शुल्क मान्यतेसाठी समितीसमोर ठेवणे. | २०.१०.२०१९ | २०.११.२०१९ |
| ५ | शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालयांचे वर्षीय अभ्यासक्रमांचे शैक्षणिक वर्ष २०१९–२१ साठी मान्यताप्राप्त शिक्षण शुल्क संकेतस्थळावर जाहीर करणे. | २५.११.२०१९ ते २८.११.२०१९ | |

*(प्रस्ताव छाननीच्या अनुषंगाने )

सहसंचालक,
शिक्षण शुल्क समिती,
मुंबई

**<u>प्रस्ताव सादर करण्यासाठी अंतिम दिनांक-</u>

| | | |
|---|---|---|
| १. | स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड व संलग्नीत महाविद्यालये- | ३०.०९.२०१९ |
| २. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद व संलग्नीत महाविद्यालये- | ३०.०९.२०१९ |
| ३. | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर व संलग्नीत महाविद्यालये- | ३०. ०९.२०१९ |
| ४. | गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली व संलग्नीत महाविद्यालये- | ३०.०९.२०१९ |
| ५. | संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती व संलग्नीत महाविद्यालये- | ०१.१०.२०१९ |
| ६. | सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे व संलग्नीत महाविद्यालये- | ०१.१०.२०१९ |
| ७. | मुंबई विद्यापीठ, मुंबई व संलग्नीत महाविद्यालये- | ०१.१०.२०१९ |
| ८. | एस.एन.डी.टी. विद्यापीठ, मुंबई व संलग्नीत महाविद्यालये- | ०३.१०.२०१९ |
| ९. | कवयत्री बहीणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव व संलग्नीत महाविद्यालये- | ०३.१०.२०१९ |
| १०. | शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर व संलग्नीत महाविद्यालये- | ०४.१०.२०१९ |
| ११. | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर व संलग्नीत महाविद्यालये- | ०४.१०.२०१९ |
| १२. | कवीकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ,रामटेक, नागपूर व संलग्नीत महाविद्यालये - | ०५.१०.२०१९ |

Scanned by CamScanner